M-17

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**वृक्ष प्राधिकरण**

क्रमांक: उअउ/परि.३/१६०/वृप्रा/पी
दिनांक: ०५/१२/२०२५.

**विषयः** के / पूर्व विभागातील अंधेरी (पूर्व) येथील मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हद्दीमधील मरोळ गांवचा न.भू.क्र. १४०५ ए (भाग) धारण करणा-या भूभागावरील विमानतळ आरोग्य संघटनेच्या इमारतीच्या शेजारील भूभागाच्या विकासकामादरम्यान अडथळा करणारी झाडे काढण्यास परवानगी मिळणेबाबत.

**संदर्भः**-१) उअउ / परि. -३ /१२१ / वृपा / पी दिनांक - २१.०८.२०२५.
२) उपायुक्त / उद्याने / १२९७ दि. २६.०८.२०२५.

के / पूर्व विभागातील अंधेरी (पूर्व) येथील मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हद्दीमधील मरोळ गांवचा न.भू.क्र. १४०५ ए (भाग) धारण करणा-या भूभागावरील विमानतळ आरोग्य संघटनेच्या इमारतीच्या शेजारील भूभागाच्या विकासकामादरम्यान अडथळा करणारी झाडे काढण्यास परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव कृपया संदर्भित करावा .

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने नियोजीत इमारतीच्या बांधकामात ०२ (दोन) झाडे नियोजीत इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करीत असल्याने ०२ (दोन) झाडे (झाडांचा अनु क्र. ३. ४) कापण्यास तसेच उर्वरित दोन झाडे ०२ (दोन) झाडे (झाडांचा अनु क्र. १, २) आहे तसेच ठेवण्यास करिता उअउ / परि.३ /१२१ / वृपा / पी दिनांक २१.०८.२०२५ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता . सदर प्रस्तावाबाबत पुनश्चः स्थळ पाहणी करून प्रस्ताव सादर करणेबाबत उप आयुक्त (उद्याने) यांनी उपायुक्त / उद्याने / १२९७ दि. २६.०८.२०२५ अन्वये आदेशीत केले होते.

सदर आदेशाच्या अनुषंगाने सदर ठिकाणी कनिष्ठ वृक्ष अधिकारी के/पूर्व विभाग, सहायक उद्यान अधीक्षक के/पूर्व विभाग, उप उद्यान अधीक्षक (परि.३) , व संबंधित अर्जदारांचे प्रतीनिधी यांचे सोबत दिनांक २६.११.२०२५ रोजी पुनश्चः स्थळ पाहणी करण्यात आली. या पाहणी दरम्यान पुन्हा सदर भूखंडावर पाहणी करून सदर प्रस्तावाचे आराखडे तपासले असता नियोजीत इमारतीच्या बांधकामात ०२ (दोन) झाडे अडथळा निर्माण करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ च्या कलम ८(६) मधील तरतुदीं नुसार काढण्यात येणा-या झाडांची संख्या २५ (पंचवीस) अथवा त्यापेक्षा कमी असल्यास वृक्ष प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्य मनपा आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत.

यास्तव के/पूर्व विभागातील अंधेरी (पूर्व) येथील मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हद्दीमधील मरोळ गांवचा न.भू.क्र. १४०५ ए (भाग) धारण करणा-या भूभागावरील विमानतळ आरोग्य संघटनेच्या इमारतीच्या शेजारील भूभागाच्या विकासकामादरम्यान अडथळा करणारी वृ ०२ (दोन) झाडे (झाडांचा अनु क्र. ३. ४) कापण्यास तसेच ०२ (दोन) झाडे (झाडांचा अनु क्र. १, २) आहे तसेच ठेवण्यास परवानगी करीता मसुदापत्र जनहित याचिका क्र. ४६/२०१५ च्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक अटी व शर्तींचा समावेश करून मा. महानगरपालिका आयुक्त (अध्यक्ष, वृक्ष प्राधिकारण) यांच्या मंजुरीकरीता शिफारस करण्यात येत आहे.

सविनय सादर.

एसजी/ 3998..../टीए
5/12/2025

05/12/25

**उप उद्यान अधीक्षक (परि-३)**

**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी**

महोदय ,

उदयान अधीक्षक

**मा . उप आयुक्त ( उद्याने )**

महोदय ,

05/12/25

उप आयुक्त (उद्याने)

**मा . महानगरपालिका आयुक्त**

महोदय ,

10/12

महानगरपालिका आयुक्त

उदयान अधिक्षक व वृक्ष अधिकारी

N·19

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

क्रमांक: एमजी/3998.../टीए
दिनांक: 5/12/2025

**विषय:** के/पूर्व विभागातील अंधेरी (पूर्व) येथील मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हद्दीमधील मरोळ गांवचा न.भू.क्र. १४०५ ए(भाग) धारण करणा-या भूभागावरील विमानतळ आरोग्य संघटनेच्या इमारतीच्या शेजारील भूभागाच्या विकासकामादरम्यान अडथळा करणारी झाडे काढण्यास परवानगी मिळणेबाबत.

१. मा. उच्च न्यायलयाने जनहित याचिका क्रमांक ४६ मधील दिनांक २१.०२.२०१८ रोजीच्या आदेशान्वये मा. मनपा आयुक्त यांना त्यांचे महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ च्या कलम ८(६) मधील कलम ६ व ७, कलम ८ अन्वये प्रदान करण्यात आलेले अधिकार वापरण्यास मज्जाव करण्यात आला होता.

२. सदरहू, बाबतीत मा. उच्च न्यायालयाने सुधारीत आदेश दि. २३.०४.२०१८ रोजी पारित केले असुन, त्यात काही अटींसह सुधारणा झाल्या असुन, मा. मनपा आयुक्त यांना आपले अधिकार वापरण्यास परवानगी दिलेली आहे. त्या नंतर सदर प्रस्ताव पुढील प्रमाणे आहे.

के/पूर्व विभागातील अंधेरी (पूर्व) येथील मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हद्दीमधील मरोळ गांवचा न.भू.क्र. १४०५ ए(भाग) धारण करणा-या भूभागावरील विमानतळ आरोग्य संघटनेच्या इमारतीच्या शेजारील भूभागाच्या विकासकामादरम्यान अडथळा करणारी ०२ (दोन) झाडे काढण्यास परवानगी मिळावी याबाबतच्या विनंतीचा प्रस्ताव मे. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लि. हयांजकडून दिनांक २७.०६.२०२५ रोजी प्रस्ताव प्राप्त झाला.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त ठिकाणी पाहणी केली असता सदर जागेवर एकूण ०४ वृक्ष अस्तीत्वात असल्याचे व यापैकी ०२ वृक्ष पूर्वेकडील संरक्षक भिंतीलगतच्या इनफ्लाइट कॅटरिंग किचन कडे जाणा-या नियोजीत रस्त्याच्या मध्यभागी स्थित असून वाहनांच्या प्रवेशकरीता बाधित होत असल्याचे निदर्शनास आले. सदर अर्जदाराने दि. २५.०७.२०२५ रोजी कागदपत्रे सादर केली आहेत.

३. सदरहू जागेची पाहणी दिनांक १४.०७.२०२५ रोजी हया खात्यातील अधिकारी

१) कनिष्ठ वृक्ष अधिकारी :- श्रीम. निलेखा पाटील
२) सहा. उदयान अधिक्षक :- श्री. सुनिल पवार
३) उप उदयान अधिक्षक (परि.३) :- श्री. ज्ञानदेव मुंढे

यांनी केली असता असे आढळून आले की, सदर जागेवर एकूण ०४ (चार) झाडे अस्तित्वात असून त्यापैकी ०२ (दोन) झाडे नियोजीत इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करीत आहेत. यास्तव ०२ (दोन) झाडे (झाडांचा अनु क्र. ३, ४) (पृष्ठ क्र.सी-२३, सी-२५) कापण्यास तसेच ०२ (दोन) झाडे (झाडांचा अनु क्र. १, २) आहे तसेच ठेवण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे. पाहणीचा सविस्तर अहवाल यासोबत सादर करण्यात आलेला आहे. (पृष्ठ क्र. सी- ९ ते सी-१३).

| झाडांचा क्र. | जात | वनस्पती - शास्त्रीय नाव | अंदाजे घेर | अंदाजे उंची | अंदाजे वय (वर्षे) | कापणे/ पुनर्रोपित करणे / आहे तसेच ठेवणे | कारण/अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | सुबाभळ | ल्युकॉना ल्युकिसीफेलिया | ३' | २४' | १० | आहे तसेच ठेवणे | सदर झाड हे नियोजीत इमारतीच्या कामात अडथळा करीत नाही. |
| २ | पेल्टोफोरम | प्टेराकार्पस पेल्टोफोरम | ३' | २४' | १२ | आहे तसेच ठेवणे | सदर झाड हे नियोजीत इमारतीच्या कामात अडथळा करीत नाही. |
| ३ | बॉटल पाम | हायोफॉर्ब लॅगेनीकॉलीस | ५.४' | २८' | २२ | कापणे | सदर झाड हे नियोजीत इमारतीच्या बांधकामात अडथळा करीत आहे. |
| ४ | नारळ | कोकोस न्युसिफेरा | ४' | २४' | २० | कापणे | सदर झाड हे नियोजीत इमारतीच्या बांधकामात अडथळा करीत आहे. |

४) या प्रकरणी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ च्या कलम ८ (३) च्या तरतुदीनुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात दि. २२.०७.२०२५ (पृष्ठ क्र. सी-१९) रोजी देण्यात आलेली आहे व काढणे आवश्यक असलेल्या सर्व झाडांच्या ठळक भागावर नोटीस /सूचना चिटकविण्यात आले असुन सदर नोटीस / सूचनेसहीत झाडाचा फोटो माहितीकरिता हयासोबत जोडण्यात आलेला आहे. (पृ.क्र.सी-२३ ते सी-२५). सदर प्रस्तावाबाबत दि. ३०.०७.२०२५ रोजीपर्यंत प्रत्यक्ष व ई- मेलद्वारे आक्षेप / सुचना नोंदविण्यासाठी विनंती करण्यात आली होती. परंतू सदरहू प्रस्तावांवर दि. ३०.०७.२०२५ रोजीपर्यंत ई-मेलद्वारे कोणतीही सुचना/ आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

याद्वारे, उप उद्यान अधिक्षक (परि.३) यांना आदेशीत करण्यात आले की, दि. २२.०७.२०२५ रोजीच्या वृत्तपत्रातील प्रसिध्द जाहीरातीच्या अनुषंगाने जाहीर सुचनेत नमुद केलल्या प्रस्तावांबाबतचे मसुदापत्र तयार करावे. असे आदेश मा. उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांनी दिले. (पृष्ठ क्र. सी-१७).

M-23

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (दिनांक ०१ जानेवारी २०१८ पर्यंत सुधारीत) च्या कलम ८(६) मधील तरतुदीं नुसार काढण्यात येणा-या झाडांची संख्या २५(पंचवीस) अथवा त्यापेक्षा कमी असल्यास वृक्ष प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्य मनपा आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत व मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या दिनांक. २३.०४.२०१८ रोजीच्या आदेशात खालीलप्रमाणे अटी व शर्ती घालण्यात आले आहे.

१) म.न.पा. आयुक्त हे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपलब्ध असलेले तज्ञ यांचा सल्ला घेतील व आदेश पारित करताना ज्या तज्ञांकडुन सल्ला घेण्यात आला आहे त्यांचे नाव नमूद करतील.

२) मा. उच्च न्यायलयाच्या आदेशा नुसार मनपा आयुक्त यांनी सदर बाबतीत परवानगी दिल्यास सदर बाबतची सुचना स्थानिक वृत्तपत्रात प्रदर्शीत करण्यात यावी व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रदर्शीत करण्यात येईल. सदरहू सुचना वृत्तपत्र व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रदर्शीत झाल्याच्या २१ दिवसा पर्यंत सदरहू परवानगीची अंमलबजावणी करण्यात येणार नाही.

३) महानगरपालिका आयुक्त हे एका विविक्षित भूभागावर एकदाच परवानगी देऊ शकतील.

मा. उच्च न्यायालयाने वरील प्रमाणे दिलेल्या आदेशांचे अनुपालन या प्रस्तावात करण्यात आले आहे व ते खालीलप्रमाणे आहे.

१. महानगरपालिकेच्या उद्यान विभागातील खालील तज्ञ अधिका-यांनी स्थळ पाहणी केलेली आहे.
१) कनिष्ठ वृक्ष अधिकारी :- श्रीम. निलेखा पाटील
२) सहा. उदयान अधिक्षक :- श्री. सुनिल पवार
३) उप उदयान अधिक्षक (परि.३) :- श्री. ज्ञानदेव मुंढे

२. मा. उच्च न्यायलयाच्या आदेशा नुसार मा. मनपा आयुक्त यांनी सदर बाबतीत परवानगी दिल्यास सदर बाबतची सुचना स्थानिक वृत्त पत्रात प्रदर्शीत करण्यात येईल व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रदर्शीत करण्यात येईल. सदरहू सुचना वृत्त पत्र व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रदर्शीत झाल्याच्या २१ दिवसा पर्यंत सदरहू परवानगीची अंमलबजावणी करण्यात येणार नाही.

३. सदर भूभागावर यापूर्वी मा.महानगरपालिका आयुक्त/अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण यांच्या अधिकारीखाली सुधारीत तरतूदीनुसार कोणतेही परवानगी देण्यात आलेली नाही.

M-25

४. पक्षकाराने कामाच्या अंमलबजावणीबाबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील कालावधीबाबत फ़ेरफ़ार करावयाचा असल्यास, उद्यान अधिक्षक हे संपूर्ण प्रस्तावाची शहानिशा करून आवश्यक असल्यास फ़ेरफ़ार करण्यास संमती देतील. तसेच वृक्ष प्राधिकरणाच्या मानांकानुसार कोणत्या जातीची झाडे लावावीत त्याबाबतही उद्यान अधिक्षक निर्देश देतील.

नियमांनुसार /आदेशानुसार आवश्यक ती अर्ज प्रक्रिया शुल्क व अनामत रक्कम स्विकारल्यानंतर तसेच निकषानुसार आवश्यक ती नवीन झाडे लावण्याच्या अटीसह परवानगी देण्यात येईल.

यास्तव, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ च्या कलम ८ (३) (क) मधील तरतुदीनुसार के/पूर्व विभागातील अंधेरी (पूर्व) येथील मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हद्दीमधील मरोळ गांवचा न.भू.क्र. १४०५ ए(भाग) धारण करणा-या भूभागावरील विमानतळ आरोग्य संघटनेच्या इमारतीच्या शेजारील भूभागाच्या विकासकामादरम्यान बाधित होत असलेल्या वृक्षांबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताविण्यात येत आहे.

| अनु क्र. | कारण | कापणे | पुनर्रोपित करणे | आहे तसेच ठेवणे | एकूण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उत्खननात / बांधकामात बाधित | ०२ | ०० | ०० | ०२ | सदर झाड हे कापणी करण्यास प्रस्तावित |
| २ | अ) अग्निशामक वाहनांच्या मार्गिकेत बाधित | - | - | - | - | -- |
| | ब) वाहनांच्या मार्गिकेत बाधित | - | - | - | - | - |
| | क) मृत | - | - | - | - | - |
| | ड) झुकलेले | - | - | - | - | -- |
| | इ) प्रवेश / निकास द्वारात | - | - | - | - | -- |
| | फ) इतर | - | - | - | - | |
| ३ | अबाधित / आहे तसेच ठेवणे | - | - | ०२ | ०२ | सदर झाडे ही आहे तसेच ठेवण्यास प्रस्तावित |
| | **एकूण** | **०२** | **००** | **०२** | **०४** | |

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे अनु क्र.१ मधील ०२ वृक्ष कापण्यास प्रस्ताविण्यात करण्यास तसेच अनु क्र. ०३ मधील सद्यस्थितीत बांधकामात अडथळा करीत नसल्याने ०२ वृक्ष आहे तसेच ठेवण्याकरीता प्रस्ताविण्यात येत आहे.

सदर प्रस्तावाची पडताळणी असून यथायोग्य असल्याने मंजूरीकरीता शिफारस करण्यात येत आहे.

उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी

मा. उप आयुक्त (उद्याने)

महोदय,

उप आयुक्त (उद्याने)

मा. महानगरपालिका आयुक्त / अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण

महोदय,

महानगरपालिका आयुक्त